# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. ठाणे-४०११०१

दूरध्वनी क्र.२८१९२४८

**मंडपासाठी ना हरकत प्रमाणपत्र**

जा.क्र. मनपा/प्र.का.4 / 23/2025-26 दि. 23/08/2025

प्रति,
श्री बाळ कृष्ण गणेश मित्र मडंळ
संथाना संल्वम एन कोनार बी-००५, वैभव पार्क, मिरा रोड पूर्व

**विषय :** सार्वजनिक उत्सव साजरा करणेकरीता मंडप उभारणेस परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :**

1. महापालिकेचे आदेश जा.क्र.मनपा/अवि/447/2025-26 दि.01/08/2025
2. महापालिकेचे सुधारित आदेश जा. क्र. मनपा/अवि/ /2025-26 दि.08/08/20255
3. आपला दि.23-08-2025 रोजी प्राप्त झालेला अर्ज क्र.**MBMC/37/22/23082025**
4. स्थानिक पोलीस ठाणे, यांचेकडील ना-हरकत दाखला जावक क्र. **935** दि. **23-08-2025**
5. पोलीस वाहतूक शाखा, यांचेकडील ना-हरकत दाखला जावक क्र. **1365** दि. **21-08-2025**
6. महानगरपालिका अग्निशमन दलाचे ना-हरकत दाखला जावक क्र. **117** दि. **22-08-2025**

वरील संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्थळ :- **रेमंन्ड शोरुम समोर, दिपक हॉस्टिल जवळ, मिरा रोड पूर्व** या ठिकाणी असलेल्या सार्वजनिक रस्त्यावर/ पदपथावर दि. **25-08-2025** ते दि.**07-09-2025** पर्यंत (एकुण **14** दिवस) मंडप/स्टेज उभारणेस खालील अटी-शर्तीनुसार परवानगी देण्यात येत आहे.

**मंडप उभारणेसाठीच्या अटीशर्ती :**

1. आपल्या सार्वजनिक उत्सव मंडळाची नोंदणी असणे आवश्यक आहे.
2. मंडप परवानगीची प्रत मंडपाच्या दर्शनी भागांवर प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.
3. प्रस्तावित मंडप/ स्टेजची रुंदी रस्त्याच्या ¼ पेक्षा अधिक असणार नाही. या मर्यादेच्या आतील आकारमानाचे मंडप/ स्टेज उभारण्यास परवानगी देण्यात येत आहे. (सार्वजनिक वाहतुकीस अडथळा येणार नाही व नागरिकांना त्यापासून उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.)
4. ज्या प्रस्तावित मंडप/ स्टेज इ. उभारणीची जागा ही परिवहन सेवेच्या बस मार्गावर असेल त्या रस्त्यावर मंडप/ स्टेज इ. उभारणेकरीता किमान 12 फुट रुंद जागा ही बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीतील ट्रॅककरीता उपलब्ध राहील, याची दक्षता घेण्यात यावी.
5. मंडप/स्टेज इ. उभारणी करताना ते रोड जंक्शनपासून किमान रस्त्याच्या रुंदीच्या अर्धे याप्रमाणे जंक्शनपासून लांब राहील यांची दक्षता घेण्यात यावी. जेणेकरुन वाहने वळविणे सोपे होईल.
6. कोणत्याही ठिकाणी 8 फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप/ स्टेज इ. उभारणेस मनाई आहे. मंडप/ स्टेज इ. अंतर विद्युत तार व डी.पी. बॉक्स पेक्षा 6 फुट अंतरावर ठेवणे बंधनकारक आहे.
7. मंडप/ स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणाचा सिमेंट कॉंक्रिट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई मनाई आहे. मंडप उभारतांना वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडप/ स्टेज याकरीता आवश्यक असणारे बांबू रोवून त्यापासून अथवा पुर्वनियोजित व्यवस्थापनाप्रमाणे मंडप/ स्टेज याकरीता बांबू रोवण्यात यावेत. रस्ते/ सार्वजनिक खोदाई करुन मंडप/ स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास रस्ते अनधिकृतपणे खोदाईबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
8. ज्या ठिकाणी पक्क्या स्वरुपाचे रस्ते दुभाजक आहेत, अशा ठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भागातील 12 फुटा व्यतिरिक्त उर्वरित मंडपाची उभारणी करावी.

**कायदेशीर कारवाई :**

9. परवानगी दिल्या व्यतिरिक्त किंवा परवानगी शिवाय मंडप/स्टेज उभारल्यास स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांच्या मदतीने, अनधिकृत वा वाढीव मंडप/ स्टेज काढून टाकण्यात येतील. तसेच संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
10. मंडप व्यतिरिक्त रस्त्यावर कमानी उभारणेस परवानगी नसल्याने, कमानी उभारल्यास ती तात्काळ स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांच्या मदतीने काढून टाकण्यात येईल.

**विद्युत जोडणी/ रोषणाई बाबतच्या अटीशर्ती :**

11. मंडपाकरीता विद्युत जोडणी महापालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पोलमधुन घेता येणार नाही. असे आढळून आल्यास संबंधीत मंडळावर दंडात्मक कारवाई करुन त्यांची परवानगी रद्द करण्यात येईल.
12. महानगरपालिकेच्या विद्युत विभागामार्फत, उभारण्यात आलेल्या मंडपातील विद्युत संच मांडणीची तपासणी करण्यात येईल. जर त्यामध्ये त्रृटी असल्यास विद्युत त्रृटीची पूर्तता करुन घेणे बंधनकारक राहील.
13. झाडांवर व विद्युत पोलवर विद्युत रोषणाई करण्यास मनाई आहे. झाडांवर व विद्युत पोलवर रोषणाई केली असल्याचे आढळून आल्यास ती तात्काळ काढून टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

**पर्यावरण विषयक अटीशर्ती:**

14. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने सार्वजनिक उत्सव मंडळाने स्थापन करावयाची मूर्ती, सजावट आणि देखावे शक्यतो शाडू माती / पर्यावरणपूरक साहित्याने घडविलेली असावी असे आवाहन करण्यात येत आहे.
15. मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात 6 फूट उंची पेक्षा कमी उंचीच्या सर्व मूर्त्यांचे विसर्जन हे कृत्रिम तलावातच केले जाईल याबाबत आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे निर्देश देण्यात येत आहेत.
16. मोठ्या आकाराच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आल्यास सदर मुर्तीऐवजी विसर्जनासाठी प्रतिकात्मक स्वरुपात लहान मूर्तीचा वापर करावा. तसेच प्रतिष्ठापित मुर्तीचा वापर पुढील वर्षी करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.
17. मंडप परिसरातील स्वच्छते बाबत खबरदारी/ काळजी घेऊन अस्वच्छता निर्माण होऊ नये याकरीता कचऱ्याचे तीन स्वतंत्र डबे ठेवावेत. (ओला कचऱ्यासाठी हिरवा डबा, सुका कचऱ्यासाठी निळा डबा, घातक/ रासायनिक कचऱ्यासाठी लाल डबा) तसेच पर्यावरण विषयक सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.
18. मुर्ती विसर्जनच्या वेळी पुष्पहार, निर्माल्य व सजावट साहित्य पाण्यामध्ये न सोडता महापालिकेने ठेवण्यात आलेल्या निर्माल्य कलशात टाकण्यात यावे.

**ध्वनीक्षेपक बाबत अटीशर्ती :**

19. ध्वनीक्षेपकाची परवानगी संबंधीत स्थानिक पोलीस स्टेशन मधून घेणे बंधनकारक आहे.
20. ध्वनी प्रदुषण तसेच इतर प्रदुषण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची राहील.

**बोर्ड/ बॅनर बाबत अटीशर्ती:**

21. मंडपाच्या प्रवेशद्वारा जवळ एकच बॅनर लावण्याची परवानगी देण्यात येत आहे. इतर ठिकाणी रस्त्यावर कमान लावणेस व बॅनर प्रदर्शित करणेस प्रतिबंध आहे.

**इतर कार्यपध्दती:**

22. अग्निसुरक्षा नियमांचे पालन करणेची जबाबदारी आपली राहिल.
23. उत्सव कालावधीमध्ये मा. न्यायालयाकडून व राज्य शासनाकडून वेळोवेळी जारी करणेत येणाऱ्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहिल.
24. ok

वरील अटीशर्तींचे भंग झाल्यास सदरची परवानगी रद्द करुन उचित नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

( )
**सहा. आयुक्त**
प्रभाग कार्यालय क्र.4
मिरा भायंदर महानगरपालिका

**प्रत माहितीस्तव**
विद्युत विभाग
मिरा भायंदर महानगरपालिका